# साहित्य : वैचारिक ग्रंथ पुरस्कार मनोगत : करूणा गोखले



करुणा गोखले यांनी मायक्रोबायॉलॉजीमध्ये बी.एस्सी, रशियनमध्ये एम.ए. व एम्.फिल आणि भाषाशास्त्रात पीएच्.डी केली. त्यांनी आतापर्यंत सात पुस्तकांचे मराठीत अनुवाद केले आहेत; त्यांतील 'सिमॉन द बोवा' यांचे 'सेकंड सेक्स' आणि बट्रॉंड रसेल यांचे 'द कॉन्केस्ट ऑफ हॅपिनेस' ही दोन पुस्तके विशेष उल्लेखनीय आहेत. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कार्यक्षेत्रातील एकातरी पुस्तकाचा अनुवाद मराठीत करावा, हा विंदा करंदीकर यांचा विचार 'सेकंड सेक्स'च्या अनुवादामागची प्रेरणा होती. स्त्रीमुक्तीच्या संदर्भात 'सेकंड सेक्स' हे बायबल मानले जाते. 'बाईमाणूस' हे स्वतंत्र पुस्तक आहे. वर्तमानातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे स्थान, स्त्रीशिक्षण, स्त्रीविषयक कायदे, स्त्री देहाविषयी धर्माचा व प्रसारमाध्यमांचा दृष्टिकोन यांची चर्चा या पुस्तकात केली आहे. स्त्रीवाद ही स्वयंभू, स्वतंत्र विचारधारा नसून ती लोकशाहीचीच एक शाखा आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न 'बाईमाणूस' करते.

**स्व**त:च्या लेखन प्रेरणांविषयी काही लिहावे एवढे लेखन माझ्या नावावर नाही. सात अनुवाद आणि दोन स्वतंत्र पुस्तके, एवढीच काय ती खात्यावरची पुंजी. त्यामुळे लेखनामागच्या प्रेरणांऐवजी कारणांवर लिहिणे अधिक संयुक्तिक होईल.

स्वत:विषयी लिहिणे तसे अवघडच असते. शिवाय माझ्या लेखनामागची कारणे जाणून घेण्याने कुणाचा काही फायदा होईल, याविषयीही मी साशंक आहे. परंतु 'साधना'कारांची तशी सूचनाच असल्याने प्रयत्न करते.

मी लिहू का लागले, याचा माग काढायला बसले आणि येऊन थडकले सिमोन द बोव्हांच्या काही वाक्यांवर. आपल्या प्रदीर्घ आत्मचरित्रात ती एके ठिकाणी म्हणते, ''जेव्हा स्वास्थ्याची शाश्वती राहत नाही; आयुष्याची घडी बिघडू लागते, तेव्हाच माणूस काहीतरी घडवू बघतो.'' आयुष्याच्या एका टप्प्यावर मलाही हे विधान लागू झाले, तेही अगदी अनपेक्षितपणे.

१९९० साली मी पीएच.डी. करून भारतात परतले. डोळ्यांसमोर काही उपक्रम होते. त्यासाठी कुठल्या ना कुठल्या शैक्षणिक संस्थेस संलग्न होणे गरजेचे होते. नोकरी घेण्याचे, अर्थार्जनाचे काही बेत होते. परंतु भारतात परतल्या-परतल्या माझी तान्ही मुलगी गंभीररित्या आजारी पडली. पुढची ६-७ वर्षे तिला खूप जपावे लागेल, असे डॉक्टरांनी बजावले. आणि मला अर्थार्जनाच्या सर्व संधी सोडाव्या लागल्या. योजलेला एकही उपक्रम हाती घेणे अशक्य झाले. करीअर बांधणीच्या सर्व शक्यता निदान त्यावेळी तरी संपल्यासारख्या वाटल्या. मुलीच्या प्रकृतीची काळजी आणि स्वत:च्या करीअरविषयीचा अपेक्षाभंग, याने पराकोटीचे वैफल्य आले. या वैफल्यातून बाहेर येण्याचा एकच मार्ग दिसत होता, तो म्हणजे हातून काहीतरी सकारात्मक निर्माण करणे.

वाचनाचे व्यसन होतेच. एम.फील. आणि पीएच.डी चे प्रबंध लिहिताना लेखनातील शिस्तीचेही प्रशिक्षण मिळाले होते. शिवाय उच्च शिक्षण रशियन भाषेत झाले असल्याने त्यातील काही अजरामर साहित्यकृतींशी चांगला परिचय होता. या सर्व सामग्रीचा उपयोग करून मी आवडलेल्या रशियन सल्झेनित्सिन रास्पुतिन साहित्यातील निवडक उताऱ्यांचा मराठीत अनुवाद करण्याचे काम हाती घेतले. परिस्थितीवर नाराज झालेल्या माझ्या मनाला बौद्धिक समाधान देणारे काम देणे, ही त्यावेळी माझी तातडीची निकड होती. त्यानुसार मी अलेक्झांडर सल्झेनित्सिनच्या 'कॅन्सर वॉर्ड'मधील माझ्या आवडीच्या उताऱ्यांचा अनुवाद केला. 'गुलमोहर' मासिकाचे संपादक श्री. अनिल किणीकर यांनी तो प्रसिद्ध करून प्रोत्साहन दिले. त्यानंतर सल्स्झेनित्सिन आणि वालेंतिन रास्पुतिन या आणखी एका लेखकाच्या काही कथा गुलमोहरसाठी मराठीत भाषांतरीत केल्या. अनुवाद करणे ही किती आव्हानात्मक पण त्याचवेळी आनंदाची प्रक्रिया असते, याचा अनुभव घेतला. हळूहळू या अनुभवाची चटकच लागली.

लहानपणी 'चिमुकल्या स्त्रिया', 'पाडस' या अनुवादांनी, 'गोड गोड गोष्टी' या रूपांतरांनी वाचनाची भूक भागवली होती. आता स्वत: अनुवाद करू लागल्यावर अनुवादप्रक्रियेकडे अधिक डोळसपणे बघणे गरजेचे वाटू लागले. 'ॲना करेनिना', 'डॉ.झिवॅगो' यांसारख्या अजरामर कलाकृती मूळ रशियनमधून वाचल्या होत्या. याच दोन कादंबऱ्यांचे इंग्लिश अनुवाद वाचून काढले आणि थरारून गेले. जेवढा आनंद मूळ रशियन साहित्यकृतींनी


# भूमिका घेणे सोपे जावे यासाठी

वर्तमानातील विवाहसंस्था, स्त्रीविषयक कायदे, कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे स्थान, स्त्रीशिक्षण,
स्त्री देहाविषयीचा धर्माचा व प्रसारमाध्यमांचा दृष्टिकोन यांची चर्चा या पुस्तकात येते. स्त्रीमुक्तिवाद
म्हणजे हजारो वर्षांच्या महासत्तेला दिलेले संघटीत आव्हान आहे.
प्रबोधन युग, त्यानंतर झालेली फ्रेंच राज्यक्रांती त्या पाठोपाठ सुरू झालेली
औद्योगिक क्रांती यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, समन्याय, व्यक्तिस्वातंत्र्य
या मूल्यांना प्रतिष्ठा दिली. मात्र, ही मूल्ये स्त्रियांना लागू केली गेली नाहीत.
म्हणून स्त्रीमुक्तिवादाची वेगळी राहुटी उभी करावी लागली. परंतु स्त्रीवाद ही स्वयंभू,
स्वतंत्र विचारधारा नसून ती लोकशाहीचीच एक शाखा आहे,
हे पटवून देण्याचा प्रयत्न 'बाईमाणूस' करते.

दिला होता. जवळपास तेवढेच समाधान मिळेल एवढे ते समर्थ अनुवाद होते. तेव्हापासून अनुवाद करणे आणि त्याची यथातथ्यता पडताळून बघणे हा छंद जडला. पीएच.डी मिळाली, तरी वेगळ्या पद्धतीची विद्यार्थीदशा सुरू झाली. या काळात नवे आधाशासारखे वाचले; जुने जे आवडले होते, त्याचा अनुवाद केला. तो स्वयंउपचाराचा एक भाग होता हे खरेच; पण त्याचबरोबर ''प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीने आपल्या कार्यक्षेत्रातील एक महत्त्वाचे पुस्तक मराठीत आणावे'', ही विंदांनी दिलेली प्रेरणापण कामाला लावत होती. The Second Sex चा अनुवाद याच प्रेरणेतून पूर्ण झाला.

**'बाईमाणूस' या पुस्तकाची पार्श्वभूमी**

अर्थार्जन, संशोधन यांची आपली गाडी रुळावर येत नाही, त्यामध्ये आपले 'स्त्री' असणे हा निर्णायक घटक आहे हे वारंवार प्रत्ययास येत होते. त्यामागची कारणमीमांसा समजून घेणे निकडीचे वाटू लागले. सुदैवाने स्त्री-मुक्ती संघटनेच्या काही कार्यकर्त्यांशी परिचय झाला, सूर जुळले आणि मी मुलीला पाठुंगळी घेऊन त्यांच्या उपक्रमांत सहभागी होऊ लागले. माझ्या विचारांना आणि कामाला निर्णायक वळण मिळाले. नवी दृष्टी लाभली. ग्रामीण आणि शहरी स्त्रियांचे निराळ्या पद्धतींनी होणारे दरिद्रीकरण, विकासाच्या कचकडी संकल्पनांचे स्त्रीच्या अर्थार्जनावर होणारे दुष्परिणाम, स्त्रीचे श्रम आणि त्याग यांवर आधारित कुटुंबव्यवस्था, धर्म, मूल्यव्यवस्था यांद्वारे उभी केलेली आदर्श स्त्रीची प्रतिमा व त्याविषयी स्त्री व पुरुष या दोहोंचाही पद्धतशीरपणे होणारा बुद्धिभेद, मानवी देहाचा व्यापार, स्त्रीचे वस्तूकरण, त्यातून घडणारी अब्जावधींची उलाढाल, मूलतत्त्ववादातून होणारी स्त्रियांची ससेहोलपट... इत्यादी स्त्री प्रश्नांच्या व्याप्तीने डोके भंजाळून गेले.

स्त्री मुक्ती संघटनेतील माझे काम जेवढे वस्तीपातळीवर चालायचे, तेवढेच अभ्यासात्मकही होते. त्यामुळेच एक भान आले की, व्यक्तीस भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची मुळे समष्टीत दडलेली असतात. Personal is Political या केट मिलेटच्या उक्तीची प्रचिती येऊ लागली. समाजात मोठ्या प्रमाणावर भेडसावणाऱ्या प्रश्नांची मांडणी 'व्यवस्थेचे' विश्लेषण करतच करावी लागते ही उमज आली. आधीचा राजकीय अज्ञपणा काही अंशी तरी कमी झाला. इतर अनेक सामाजिक चळवळींविषयी सजगता वाढली. स्त्रियांसकट सर्वच वंचितांचे प्रश्न हे सत्ताविहीत व सत्ताधारी यांच्यामधील संघर्षातून उद्‌भवतात. त्यामुळे सामाजिक चळवळी या एक प्रकारे राजकीय बदलच घडवू बघत असतात. स्त्री प्रश्नांविषयीच्या जाणीव-जागृती शिबिरांमधून आम्ही ही मांडणी करत होतोच. तीच अधिक घट्टमुट्ट होऊन 'बाईमाणूस'मध्ये अवतरली. थोडक्यात 'बाईमाणूस'ला माझ्या २२ वर्षांच्या स्त्री मुक्ती चळवळीतील कामाची पार्श्वभूमी आहे.

या पुस्तकातून काय सांगितले आहे? गेली हजारो शतके पृथ्वीतलावर एक महासत्ता नांदते आहे. ती म्हणजे पुरुषप्रधानता. धर्मसत्ता, अर्थसत्ता आणि ज्ञानसत्ता हे पुरुषकेंद्री महासत्तेचे बालेकिल्ले आहेत. त्यांच्या बळकटीसाठी वापरलेले उच्च प्रसारमाध्यम म्हणजे धर्म! कुटुंबसंस्था हे याच महासत्तेचे छोटे प्रारूप आहे. वरील दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून वर्तमानातील विवाहसंस्था, स्त्रीविषयक कायदे, कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे स्थान, स्त्रीशिक्षण, स्त्री देहाविषयीचा धर्माचा व प्रसारमाध्यमांचा दृष्टिकोन यांची चर्चा या पुस्तकात येते. स्त्रीमुक्तिवाद म्हणजे हजारो वर्षांच्या महासत्तेला दिलेले संघटीत आव्हान आहे. प्रबोधन युग, त्यानंतर झालेली फ्रेंच राज्यक्रांती त्या पाठोपाठ सुरू झालेली औद्योगिक क्रांती यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, समन्याय, व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांना प्रतिष्ठा दिली. मात्र, ही मूल्ये स्त्रियांना लागू केली गेली नाहीत. म्हणून स्त्रीमुक्तिवादाची वेगळी राहुटी उभी करावी लागली. परंतु स्त्रीवाद ही स्वयंभू, स्वतंत्र विचारधारा नसून ती लोकशाहीचीच एक शाखा आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न 'बाईमाणूस' करते.

सदर पुस्तक म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळीचा इतिहास नाही. त्यात स्त्रीमुक्तिवादाच्या परिघात स्त्री जीवनाशी निगडीत कोणकोणते मुद्दे येतात, त्याची चर्चा केली आहे. स्त्रीमुक्तीचा लढा हा मानवमुक्तीचा लढा आहे. तो केवळ स्त्रीशिक्षण, स्त्रीचे अर्थार्जन, स्त्रीस मतदानाचा अधिकार यांपुरता मर्यादित नाही. स्त्रीवादी साहित्य धर्म, वर्ण, भाषा, आर्थिकस्तर यांच्या सीमा ओलांडून वैश्विकतेकडे झेपावत आहे. समाजाच्या न्यायबुद्धीला धार लावण्याचे मोलाचे काम स्त्रीवादाने केले आहे. आपली इच्छा असो, वा नसो स्त्रीशिक्षण, स्त्रीजागृती यांमुळे समाजाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. प्रत्येक स्त्री-पुरुषाला ते समजून घेऊन स्त्री-पुरुष समानतेविषयी काही एक भूमिका घेणे अपरिहार्य होऊन बसले आहे. अशी भूमिका घेणे सोपे जावे म्हणून 'बाईमाणूस' हा स्त्रीमुक्तिवाद म्हणजे नक्की काय, हे समजून सांगण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

**– करुणा गोखले**
सप्तसूर, एच-४०३, डी.एस.के.विश्व,
धायरी, पुणे ४११०४१.
Mob.: 9322770073

## ओळख । सुजाता देशमुख

**क**रुणा गोखलेचं एका वाक्यात वर्णन करायचं झाल्यास, "She is a short woman with long strides!"

तिची माझी पहिली भेट बऱ्याच वर्षांपूर्वी एका लेखाद्वारे झाली. त्या वेळी 'मिळून साऱ्याजणी' या मासिकात मी काम करत होते. 'दंतकथा' या शीर्षकाचा करुणानं लेख पाठवला होता. आपल्या बाळाच्या दाताच्या दुखण्यासाठी दंतवैद्याची पायरी चढल्यानंतर आलेला अनुभव, उपचारांतल्या त्रुटी, त्याकडे 'नशीब' म्हणून दुर्लक्ष न करता त्याविरुद्धची दिलेली लढत, यांचं हे उत्तम शब्दचित्र होतं. त्या लेखातले तपशील मला आठवत नाहीत, परंतु त्यातून तिचा प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन, अन्यायाविरुद्ध लढताना कोणताही अभिनिवेश न आणता चोख कायदेशीरपणे पकडलेली वाट आणि या सगळ्याचा आढावा घेताना लिखाणात असलेली वस्तुनिष्ठता मनात कुठेतरी खोलवर रुजली. करुणाच्या लिखाणाचा दर्जेदारपणा केव्हाही वाचकाला समृद्ध करून जातो, त्याची ती झलक होती. काही वर्षं अशीच गेली. त्यानंतर करुणा भेटली ती एका अनुवादाच्या निमित्तानं. त्यावेळी मी 'राजहंस प्रकाशना'मधे होते. करुणाची भाषाशैली, अभ्यासू वृत्ती, विषयाची पकड घेण्याची क्षमता आणि या सर्वांबरोबरीनं स्त्री–मुक्ती चळवळीशी वर्षानुवर्षांचं असलेलं नातं हेरून प्रकाशक दिलीप माजगावकरांनी 'स्त्रीवाद आणि स्त्री–मुक्ती चळवळ' या विषयावर जनसामान्यांसाठी तिनं लिहावं, अशी जबाबदारी तिच्यावर टाकली आणि 'बाईमाणूस'चा जन्म झाला.

'स्त्रीवादा'सारखा गहन विषय 'सोपा' करून मांडताना 'पातळ' होऊ न देणं फार अवघड होतं. परंतु ही अवघड कामगिरी अपेक्षेबरहुकूम करुणानं कमालीच्या सहजतेनं पार पाडली. याचं इंगित अर्थातच करुणाच्या एकूण व्यक्तिमत्त्वात दडलेलं आहे. ती बुद्धिमान आहेच; तिचं वाचन अफाट आहे, प्रत्येक गोष्टीमागे स्वत:चा विचार आहे; स्त्री–मुक्ती चळवळीमधे काम करण्याचा वर्षानुवर्षांचा दांडगा अनुभव आहे आणि त्यातून येत गेलेली प्रगल्भताही आहे.

करुणाच्या बाबतीतला आणखी एक विरळा गुण म्हणजे तिच्या सगळ्या विचारांना एक तात्त्विक बैठक आहे. त्यामुळेच तिचं मूळ लेखन असो वा अनुवाद असो, त्या–त्या लिखाणाला अर्थपूर्ण सलगता आणि परिपूर्णता असते.

करुणाचे सात अनुवाद प्रकाशित झाले आहेत. आता महाराष्ट्र फाऊंडेशनचा वैचारिक साहित्याचा पुरस्कार मिळवणाऱ्या 'बाईमाणूस'ला महाराष्ट्र शासनाचा भा.ल.भोळे पुरस्कारही मिळाला आहे. 'बाईमाणूस', वैशिष्ट्यं मांडण्यापूर्वी मला आवर्जून करुणाच्या अनुवादाच्या ताकदीचा उल्लेख करावासा वाटतो. अनुवाद हा नेहमी भावानुवाद असावा आणि त्या लेखकाचं संपूर्ण लेखन– तो ज्या भाषेत लिहितो– त्यातल्या सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, सामजिक संदर्भांसहित, अर्थच्छटांसहित समजून घेऊन मगच ते आपल्या भाषेमधे उतरवावं, या अभिजात व्याख्येचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे करुणाचे अनुवाद आहेत. दृष्ट लागू नये म्हणून तीट लावण्यासारखा तिच्या लिखाणातला बारीकसा दोष

## गोचीदार प्रसंगात अत्यंत उपयुक्त

एकीकडे जगभर स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार वाढत असला, तरी दुसरीकडे त्याचं ओझंही वाढत चाललंय. एक पाहणी–अभ्यास असं सांगतो. की जगामध्ये स्त्रियांच्या नावावर एक टक्का मालमत्ता आहे आणि नव्याण्णव टक्के पुरुषांच्या नावावर! स्त्रियांना कनिष्ठ मानणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेचं आणखी कोणतं ढळढळीत उदहारण हवं? या आणि अशा अनेकानेक कंगोऱ्यांचा विचार करणारं, विचार करायला प्रवृत्त करणारं आणि विचार करणाऱ्याला चालना देणारं 'बाईमाणूस' पुन्हा पुन्हा वाचावं, आपल्या मनातल्या शंका वा अनुभव त्या निकषांवर घासून पाहावेत, परत–परत स्वत:ला नखलून बघावं इतकं ते नेटकं झालं आहे.

काढायचाच झाला, तर ती विशिष्ट मर्यादेच्या अलीकडे सोपं लिहू शकत नाही, एवढंच!

'बाईमाणूस'च्या लेखनप्रक्रियेमधे असतानाच करुणानं एकदा एक फार महत्त्वाचा मुद्दा मांडला. ती म्हणाली, ''चळवळीच्या अनुषंगानं काम करत असताना स्त्री-प्रश्नांबाबत अनेकदा लोकांबरोबर सवाल-जबाब घडत असतात. अशा वेळी स्त्रीवादाचा सखोल अभ्यास असणाऱ्या एका तरी तयारीच्या व्यक्तीला आम्ही बरोबर घेतो; नाहीतर ऐनवेळेला जर योग्य प्रतिउदाहरणं किंवा बिनतोड प्रत्युत्तरं देता आली नाहीत, तर फार पंचाईत होते.'' हा अनुभव सार्वत्रिकच म्हणावा लागेल. विशेषत: स्त्री-प्रश्नांच्या बाबतीत पुरुषच नव्हेत, तर बायकासुद्धा एवढ्या तोंडघशी पाडतात, की 'You too Brutus?' असं म्हणावंसं वाटतं. यामागे 'पुरुषश्रेष्ठत्व' आणि 'स्त्रीची नगण्यता' मानव जमातीत आदिकाळापासून मुरलेलं आहे, हे कारण आहे. स्त्रीमुक्ती चळवळीद्वारे आजवर यावर बराचसा ऊहापोह झाला असला, तरीही स्त्री-प्रश्नांबाबतची 'अनाकलनीयता' आणि 'अनभिज्ञता' एवढी व्यापक आहे, की 'आला प्रश्न की त्यावर गोळीबंद उत्तर' फेकता येत नाही. कारण अगदी पुरोगामी म्हणवणाऱ्यांच्या मनातसुद्धा 'स्त्री-प्रश्नां'बाबत स्पष्टता असतेच असं नाही. याशिवाय, परंपरागत स्त्री-प्रश्नांना आज जरी किमान वाचा फुटली असली, तरीही काळ बदलत जातो, तसतशी प्रश्नांची रूपं कालानुरुप बदलत जातात, त्यांचं काय? पुरुषप्रधानता आणि स्त्रीचं दुय्यमत्व समाजातून उखडून काढून पुन्हा नवनव्या प्रश्नांना सामोरं जात राहणं हे शिवधनुष्यच होऊन राहतं. अशा गोचीदार प्रसंगात अतिशय उपयुक्त 'मार्गदर्शक' ठरेल इतकं मूलभूत काम 'बाईमाणूस'द्वारे करुणानं करून ठेवलं आहे.

या पुस्तकाचा गाभाघटक आणि वेगळेपण नमूद करण्यासाठी करुणाच्याच मनोगतातल्या दोन परिच्छेदांचा आधार घेते.

'सदर पुस्तक म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळीचा संक्षिप्त इतिहास नाही. इतिहास म्हटला, की त्यात महत्त्वाच्या घटना, सनावळ्या आल्या. यातलं काहीच या पुस्तकात सापडणार नाही. याचं कारण हे पुस्तक स्त्री-चळवळीच्या अभ्यासकांसाठी नसून, कुठल्याही क्षेत्रातल्या जिज्ञासू अशा वाचकांसाठी आहे. अशा वाचकवर्गाला घटना, सनावळ्या यापेक्षाही विशिष्ट विषयामागील भूमिका/विचार जाणून घेण्यात अधिक रस असतो. म्हणूनच हे पुस्तक 'स्त्रीमुक्ती' या 'संकल्पनेस' मध्यवर्ती ठेवून रचलेलं आहे. स्त्रीमुक्तिवादाच्या परिघात स्त्रीजीवनाशी निगडित, किंबहुना मानवी समाजरचनेतले कोणकोणते मुद्दे येतात त्यांची चर्चा यात केली आहे. ती करताना क्लिष्टता येऊ नये याचं भान सतत ठेवावं लागलं. याच कारणास्तव स्त्रीमुक्ती या शब्दप्रयोगाच्या विविध व्याख्यासुद्धा इथे उद्धृत केलेल्या नाहीत. असं असूनही स्त्रीमुक्ती म्हणजे नक्की काय, याची पुरेशी जाण वाचकाला येईल असा प्रयत्न इथे केला आहे.

स्त्रीमुक्ती या संकल्पनेची बहुतांश वेळा, बहुतांश लोकांकडून हेटाळणी होते याचं कारण समाजव्यवस्थेत आणि पर्यायानं मनुष्याच्या दैनंदिन व्यवहारात स्त्रीला किती जाचक नियमांनी जखडलेलं असतं ते बहुतांशांच्या लक्षातच येत नाही. स्त्रीवरील एकतर्फी निर्बंध लक्षात आणून देणं हा पुस्तकाचा मुख्य हेतू आहे. स्त्रीच्या ललाटी लिहिलेलं दुय्यमत्व समाजाला तर सोडाच, पण तिलासुद्धा अनेकदा जाणवत नाही. ते जर जाणवलं, तरच ते खटकेल. जर ते खटकू लागलं, तरच त्यांवर पोटतिडिकीनं भाष्य करणारा स्त्रीमुक्तिवाद जाणून घेण्याची इच्छा होईल. तशी ती व्हावी हा या पुस्तकामागचा उद्देश आहे.'

जगभरच्या स्त्रीमुक्ती चळवळीला दोनशे वर्षांचा इतिहास आहे. करुणानं हे पुस्तक लिहिण्याआधी स्त्रीवादी लेखिकांच्या बऱ्याच पुस्तकांचा अभ्यास केलेला आहे. या चळवळींनी उघड केलेले प्रश्न आणि त्यांचं विश्लेषण जाणून घेतलं आहे.

या पुस्तकाची सुरुवात 'स्त्रीदेह' नावाच्या प्रकरणातून होते. यामधे स्त्रीच्या शरीराबाबतच्या तर्कदुष्ट विधानांचा सर्वांगांनी तर्कसुसंगत प्रतिवाद करत 'स्त्री-पुरुष समानतेची चळवळ' ही एका दृष्टीनं सुजाण पालकत्वाची चळवळ कशी व्हायला हवी, इथपर्यंत हे प्रकरण आपल्याला बोट धरून आणतं.

पुस्तकाच्या प्रत्येक प्रकरणामधे त्या त्या विषयाबाबतचे समाजातले प्रचलित समज-गैरसमज, रुढी-परंपरा, शास्त्रीय कारणमीमांसा, स्त्रीमुक्तिवाद्यांचे आणि चळवळीचे त्यांबाबतचे आक्षेप, त्यांवरची उत्तरं आणि चळवळीमागच्या धोरणांची उद्दिष्टं असं व्यापक पटल आहे. आणि सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्याला वर्तमानातल्या प्रश्नांची जोड असल्यामुळे त्याची कालसापेक्षता वादातीत ठरली आहे. शिवाय स्त्रीचं समाजाला असलेलं योगदान अधोरेखित करणं हे स्त्रीवादी समीक्षेचं मोठं उद्दिष्टही या पुस्तकातून पुढे येतं. आणि सर्वांत शेवटच्या 'समारोपा'त स्त्रियांपुढच्या अव्याहत आव्हानांचा एक संक्षिप्त धांडोळा घेण्यात आला आहे. 'कारण स्त्रीचं काम कधी संपत नाही' या एका अज्ञात लेखकाच्या वाक्यानं सुरुवात होणारे तीन परिच्छेदच 'Women's rights are human rights' कसे, याची फार रसाळ मांडणी करतात.

'कारण स्त्रीचं काम कधी संपत नाही.'

...कारण त्या कामाचा तिला मोबादला मिळत नाही, किंवा कमी मिळतो. ...कारण सगळ्यांत आधी आम्हांलाच

नोकरीवरून डच्चू मिळतो... कारण स्त्रीच्या वाट्याला तीच तीच, एकसुरी, कंटाळवाणी कामं येतात,... कारण आमच्या कामापेक्षा आम्ही दिसतो कसे याला जास्त महत्त्व असतं;... कारण आमच्यावर बलात्कार झाला तर तो आमच्याच चुकीमुळे होतो आणि आम्हांला कुणी मारहाण केली, तर आम्ही त्याला चिथावलेलं असतं म्हणून...

आम्ही जर आमच्या हक्कांसाठी आग्रह धरला, तर आम्ही आक्रमक आणि पुरुषी; आग्रह नाही धरला, तर आम्ही स्त्रीसुलभ दुबळ्या! आम्हांला जर लग्न करावंसं वाटलं, तर आम्ही पुरुषाला जाळ्यात ओढायला निघालो आहोत असं समजतात आणि लग्न नाही केलं, तर आम्ही विक्षिप्त!.. या आणि अशा अनेक कारणांसाठी आम्ही स्त्रीमुक्ती-चळवळीत सामील झालो आहोत.'

करुणानं प्रत्येक प्रकरणाची सुरुवात करताना, त्यातल्या आशयाला सुसंगत ठरतील अशी स्त्रीवादी लेखकांची वेचक वाक्यं दिली आहेत. उदाहरणच द्यायचं झालं, तर 'विषयप्रवेश' करताना तिनं, रेबेका वेस्ट या स्त्रीवादी लेखिकेचं पुढील वाक्य दिलं आहे.

'स्त्रीमुक्तिवाद म्हणजे नक्की काय हे मला नीटसं कळलेलं नाही. पण मी जेव्हा मला लोकांनी पायपुसणं, किंवा वेश्या समजू नये असं आग्रहानं मांडते, तेव्हा लोक मला स्त्रीमुक्तिवादी म्हणतात.'

या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, करुणा कोणत्याही प्रकारे 'राजकीय डावपेचात' अडकलेली नाही. मथितार्थ असा, की भारतातल्या स्त्रीमुक्ती चळवळीवर डाव्या राजकीय विचारप्रणालीचा जबरदस्त पगडा आहे. त्यामुळे पुष्कळ वेळा होतं असं, की त्या राजकीय विचारांच्या चौकटीतलीच उदाहरणं देण्याचा मोह पडतो. 'राजकारण' आणि 'चौकट' या दोन गोष्टी आल्या, की अपरिहार्यपणे प्रतिवादाची तेवढ्याच ताकदीची उदाहरणं समोर उभी राहतात. वस्तुस्थिती एक आणि उदाहरणं दुराग्रहानं विशिष्ट राजकीय विचारप्रणालीला बांधलेली असली, तर मूळ प्रश्न राहतो बाजूला आणि उरतो तो नुसताच अभिनिवेश! करुणानं हे 'टाळलं आहे' असं म्हणण्यापेक्षा करुणाच्या व्यक्तिमत्त्वात प्रगल्भता असल्यामुळे या पुस्तकाला एक निखळ वैचारिक आत्मभान लाभलं आहे, असं मी म्हणेन आणि पुस्तकाच्या यशस्वितेमागचं ते एक मोठं श्रेयच आहे, असंही मानेन.

'स्त्री' एकसंध समाज नसल्यामुळे तिचे प्रश्न जगड्व्याळ आहेत. स्त्रियांचे प्रश्न 'स्त्रियांचे' म्हणून नव्हेत, तर मानवी प्रश्न म्हणून मांडायला हवेत, तरच स्त्रीमुक्ती समानतेची चळवळ वृद्धिंगत होऊन अपेक्षित ध्येयापर्यंत पोचेल अशा आशेला नक्की जागा राहील, याची ग्वाही या पुस्तकातून मिळते.




मात्र यासाठी पुरुषांची मानसिकताही बदलायला हवी आहे. वर्षानुवर्ष धर्माचं नेतृत्व पुरुषांकडे आणि सांभाळ स्त्रियांकडे राहिल्यानं स्त्रियांच्या प्रश्नांना दु:सह साखळदंड लाभले आहेत. त्यामुळे एकीकडे जगभर स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार वाढत असला, तरी दुसरीकडे त्याचं ओझंही वाढत चाललंय. एक पाहणी-अभ्यास असं सांगतो, की जगामध्ये स्त्रियांच्या नावावर एक टक्का मालमत्ता आहे आणि नव्याण्णव टक्के पुरुषांच्या नावावर! स्त्रियांना कनिष्ठ मानणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेचं आणखी कोणतं ढळढळीत उदहारण हवं? या आणि अशा अनेकानेक कंगोऱ्यांचा विचार करणारं, विचार करायला प्रवृत्त करणारं आणि विचार करणाऱ्याला चालना देणारं 'बाईमाणूस' पुन्हा पुन्हा वाचावं, आपल्या मनातल्या शंका वा अनुभव त्या निकषांवर घासून पाहावेत, परत-परत स्वत:ला नखलून बघावं इतकं ते नेटकं झालं आहे.

**सुजाता देशमुख**
(संपादक : मेनका प्रकाशन)
एस-८, सुयोगनगर शिवाजी हौसिंग सोसायटी मागे,
सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे १६
Mob.: 9881004459